
# औषधांचे दुष्परिणाम

डॉ. राहुल कुलकर्णी
**(Neurologist)**



**डॉ. राहुल कुलकर्णी**
**(Neurologist)**

**डॉ. राहुल विठ्ठल कुलकर्णी हे पुण्यातील प्रथितयश न्युरोलॉजिस्ट आहेत. १९९२ साली पुण्याच्या बी.जे. मेडिकल कॉलेज मधून त्यांनी प्रथम क्रमांकाने M.B.B.S. पदवी प्राप्त केली आहे. तसेच मुंबई विद्यापीठातून त्यांनी D.M. Neurology पदवी विशेष प्राविण्याने मिळविली आहे. त्यानंतर २००० साली DNB Neurology ही पदवी प्राप्त केली आहे. गेली १३ वर्षे ते पुण्यात प्रॅक्टिस करत आहेत व दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये कन्स्लटंट म्हणून कार्यरत आहेत. बी.जे. मेडिकल कॉलेज व ससून जनरल हॉस्पिटल येथे असि. प्रोफेसर म्हणून विद्यादानाचे कार्यही करतात. गेली अनेक वर्षे ते पार्किन्सन्स मित्रमंडळाचे खंदे व सक्रीय पाठीराखे आहेत.**

Parkinsons च्या आजारासाठी सध्या तरी औषधांना पर्याय नाही. या आजाराची औषधे कायमस्वरूपी घ्यावी लागतात. Diabetis किंवा Blood Pressure च्या औषधांप्रमाणे ही औषधे जीवनाचा अविभाज्य घटक बनतात; त्यामुळे आजाराइतकीच औषधांची माहिती असणे गरजेचे आहे.

औषधांनी आजाराची लक्षणे कमी होण्यास नक्कीच मदत होते. ही औषधे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय बंद किंवा कमी जास्त करणे धोकादायक असते.

आजचा लेख औषधांचा दुष्परिणाम समजण्यासाठी लिहिला आहे. हे दुष्परिणाम सर्वांना होतातच असे नाही. ते झाल्यास औषधे लगेच बंद करावी लागतात असेही नाही; पण आपण घेत असलेल्या औषधांनी काय त्रास होऊ शकतो ते समजण्यासाठी हा खटाटोप.

आपल्याला माहीत आहे की, या आजारात डोपामीन (Dopamine) चे प्रमाण कमी होते आणि औषधे ते वाढविण्याचे काम करतात. अशी सर्व औषधे घेतल्यामुळे मळमळ, उलटी होऊ शकते. याच्यावर उपाय काय? तर औषधे काहीतरी खाऊन घेणे किंवा मळमळ कमी करणारी औषधे (Domperidone) इ. त्या बरोबर घेणे. यासारख्या उपायांनी हा त्रास कमी होतो. सुरुवातीला नवीन औषधांमुळे मळमळ होते. पण नंतर ती कमीसुद्धा होते. काही रुग्णांच्या कोणत्याही मार्गांनी उलट्या बंद होत नाहीत, त्या वेळी मात्र औषधे बदलावी किंवा बंद करावी लागतात.

दुसरा दुष्परिणाम म्हणजे तोंडाला कोरड पडणे. पार्किन्सन्समुळे बऱ्याचदा तोंडातून लाळ गळते आणि औषधांनी ती कमी होते. काही वेळा लाळेचे प्रमाण कमी झाल्याने कोरड पडते; त्यामुळे काही वेळा बोलण्यास त्रास होतो. पॅसिटेन किंवा तत्सम गोळ्यांनी हा त्रास जास्त होतो. त्या वेळी डोस कमी करणे किंवा बंद करणे अशी उपाययोजना करावी लागते.

या औषधांमुळे काही वेळा झोपेवरही परिणाम होतो. तसे बघितले, तर पार्किन्सन्सचे अनेक रुग्ण झोपेत बोलतात, हातपाय झाडतात किंवा जास्त झोपतात. काही औषधे (dopamine against group ropinirole pramipexole) घेणारे रुग्ण जास्त झोपतात, तर काही जणांना अगदी दिवसाही असह्य झोप येते. त्या वेळी Controlled release प्रकारची औषधे वापरल्यास झोपेचा त्रास कमी होतो.

Bloop Pressure कमी होणे किंवा त्यामुळे चक्कर येणे हा त्रास औषधांनी सुद्धा होतो आणि आजारांनी सुद्धा!

त्यामुळे कमी होत असल्यास नक्की कारण शोधणे हे तज्ज्ञ डॉक्टरांनासुद्धा अवघड असते; परंतु पाणी, मीठ यांचे प्रमाण वाढवून, काही औषधे वापरून हा त्रास कमी करता येतो.

पार्किन्सन्सच्या उपचारांत वापरली जाणारी pacitane सारखी औषधे वयस्कर लोकांमध्ये जास्त त्रासदायक असतात. अर्थात वयस्कर शब्दाचा अर्थ प्रत्येकाच्या सोयीप्रमाणे बदलत असतो; त्यामुळे तोंडाला कोरड पडणे, लघवी होण्यास त्रास होणे, विसरणे इ. त्रास होतात; त्यामुळे तज्ज्ञ डॉक्टर वयस्करलोकांमध्ये अशी औषधे कमी वापरतात.

पार्किन्सन्स आणि भास हा स्वतंत्र लेखाचा विषय आहे. डोपामीनचे प्रमाण वाढविण्याच्या कोणत्याही औषधांमुळे भास होऊ शकतात. अर्थात भासाचे कारण फक्त औषधेच असतात असेही नाही. ताप, झोपेचे चक्र बिघडणे, वाढलेले वय, शरीरातील क्षारांचे कमी-जास्त प्रमाण, डिहायड्रेशन यामुळे सुद्धा भास होतात. रात्री वेगवेगळ्या आकृत्या, माणसे, प्राणी दिसणे, अंगावर किंवा पांघरूणावर किडे फिरत असल्याची भावना होणे, काल्पनिक लोकांचे बोलण्याचे आवाज येणे, घरच्या लोकांवर संशय घेणे इ. प्रकारचे त्रास रुग्णांना होतात. भासाचे प्रमाण वाढले, तर deliricum नावाचा त्रास होतो. त्या वेळी वेळप्रसंगी रुग्णांना दवाखान्यात ॲडमिट करावे लागते. या वेळी डॉक्टरांना औषधांचे डोस कमी-जास्त करणे ही तारेवरची कसरत करावी लागते आणि त्यांचीही कसोटी लागते; परंतु बहुतेक सर्वांचा त्रास हळूहळू कमी होतो. दुर्दैवाने भास कमी करणारी बहुतेक औषधे डोपामीनचे प्रमाण कमी करतात आणि पार्किन्सन्सचा त्रास वाढतो; त्यामुळे हा औषधांचा मेळ घालणे तसे अवघड काम आहे.

Levodopa हे या आजाराचे सर्वांत महत्त्वाचे औषध. या औषधाच्या दीर्घ वापराने पार्किन्सन्सच्या आजारावर काही दुष्परिणाम होतात का याबद्दल वैद्यकीय जगतात दुमत आहे आणि हासुद्धा वेगळा लेखाचा विषय आहे.

अर्थात एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, कोणतेही औषध जास्त काळासाठी घेतले, तर त्याचे दुष्परिणाम हे होतातच. किंबहुना असे कुठलेच औषध नाही की, ज्याला दुष्परिणाम नाही. बऱ्याचदा लोक म्हणतात की, अमुक औषधांमुळे दुष्परिणाम होणार नाहीत. त्या औषधांचा परिणाम तरी होतो का हा अभ्यासाचा विषय आहे, असे दुष्परिणाम होण्याचे प्रमाण नगण्य असते. औषधांचे फायदे हे तोट्यांपेक्षा खूप जास्त असतात. म्हणूनच त्यांना औषधे म्हणतात.

●●●


**पार्किन्सन्स मित्र मंडळाची प्रकाशने**

कदाचित मराठीतून प्रथमच प्रकाशित

१. चला संवाद साधू या.
आहार - कोणता, केव्हा व किती?
२. पार्किन्सन्स ग्रस्तांसाठी मौलिक सूचना

पार्किन्सन्स ग्रस्तांसाठी अतिशय उपयुक्त पुस्तके

मिळण्याचे ठिकाण :

पार्किन्सन्स मित्र मंडळ
द्वारा - रा. हे. करमरकर,
३, चिंतामणी अपार्टमेंट, १११९, सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०.
दूरभाष - ९४२३३३८१६४